स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

नांदेड.

मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत विद्यावाचस्पती (पीएच्.डी.)
या पदवीकरिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाची स्थूल रूपरेषा

संशोधन विषय

मराठी कथात्म साहित्यातील कोराना महामारीचे
जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक

कु. शितल गोविंद खोत

संशोधन केंद्र

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. गणेश रामभाऊ लहाने
(उपप्राचार्य)
दयानंद वाणिज्य महाविद्यालय,
लातूर - ४१३५१२

डिसेंबर - २०२४

मराठी कथात्म साहित्यातील कोरोना महामारीचे जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास

भूमिका :-

मराठी साहित्यातील कथा, कविता,कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललितगद्य यांचा अभ्यास केला. त्यात कथा हा वाड्मय प्रकार परंपरेने चालत आलेला आहे.भारतात इंग्रज आल्यानंतर मुद्रणकलेच्या आश्रयाने जे गद्य वाड्मय पुढे आले त्यात कथेचे प्रमाण विपुल होते. दुसऱ्या महायुद्धानंतर कथेमध्ये अमूलाग्र बदल झालेला दिसून येतो.कारण काळानुरूप समस्या बदलतात व या समस्यांचे चित्रण साहित्यात येत असते, त्याला वाड्मय हा अपवाद राहिलेला नाही.

कादंबरी हा मानवी जीवन व्यवहाराचे रूप प्रतिबिंबित करणारा आरसा आहे.कादंबरी हा जीवन व्यवहाराबरोबर प्रवास करणारा प्रवाही असा साहित्य प्रकार आहे.जीवन व्यवहाराच्या केंद्रस्थानी मनुष्य असतो. कादंबरीतील कथानक हे कुठल्यातरी वातावरणात घडते हे वातावरण आभासात्मक असते. कादंबरी हा जीवन प्रवाहांशी समांतरपणे चालणारा वाड्मयप्रकार असल्यामुळे स्वाभाविकच त्याचा आवाका मोठा असल्याचे दिसून येते. परिणामतः समाज, त्यातील व्यक्ती, त्याचे जीवन या साऱ्यांचे संबंधासह जगणे कादंबरीत येते, आणि तिच्या घडणीच्या संदर्भात नव्याने विचार करण्यासाठी प्रवृत्त करते.

'मनुष्य ही जात आणि मानवता हाच खरा धर्म आहे' मानवी जीवन व्यवस्थेचा पाया आहे. आपल्या जीवनाचे मूळ आहे. हे कोरोना महामारी मध्ये लोकांना अनुभवायला मिळालं. कोरोनामुळे देशव्यापी लॉकडाऊनचा निर्णय घेतला जातो आणि अनेक कुटुंबे अडचणीच्या आवर्तात सापडतात. जागोजागी कोरोनाची दहशत, कुटुंबाची झालेली वाताहत आणि दारूण मृत्यू बघावे लागतात. लोकांमध्ये हतबलता नैराश्य, भितीचे वातावरण निर्माण होतं. कोविडच्या काळामध्ये प्रवास जवळजवळ खुंटला जिथे कुटुंबीयांच्या भेटी होत नव्हत्या आणि वर्षभर

आपल्याच घरी जाता येणं शक्य नव्हतं, तिथे नव्या जागा आणि नव्या लोकांच्या भेटीगाठी होण्याची काय कथा, पण एरवीजे स्मार्टफोन आणि चॅटिंग ॲप्स पालक आणि मुलांमध्ये वादाचा मुद्दा ठरतात तीच यावेळी मदतीला धावून आली. लोक एकमेकांच्या संपर्कात राहू शकले अडीअडचणीला मदतीला धावून जाऊ शकले आणि कमी असलेला संवाद वरवरका असेना सुरू ठेवू शकले.

आयुष्यात 'पॉझिटिव्ह रिझल्ट नको रे देवा'अशी इच्छा यापूर्वी कधी झाल्याचं कोणालाही आठवत नसेल, पण कोरोनाच्या बाबतीत तेही घडून गेलं. घरातले अबालवृद्ध कोविड पॉझिटिव्ह निघतात आणि मग सुरू होतो तो क्वारंटाईनचा अध्याय.रोजगार, घरदार, आप्तेष्ट गमावल्याचे दुःख मोठचं असतं. पण या' काळ्या ढगालाही चंदेरी किनार होती'. एरवी आपल्या कोशातून बाहेर न आलेल्या अनेकांना आपल्या भोवतालची जाणीव झाली. इतरांची मदत करण्याची प्रेरणा निर्माण झाली आणि अनेकांनी त्यावर अंमल करत 'माणुसकीचा एक भला मोठा सेतू उभा केला'. व्यवस्था कितीही क्रूर असली तरी माणसाचे माणूस पण ती हिरावून घेऊ शकणार नाही हा महत्त्वाचा संदेश मिळतो. सामान्य माणूस चुकतो भरकटतो पण रक्तपिपासू कधी बनत नाही.

माणसाच्या स्वभाव धर्माची काही वैशिष्ट्ये व त्याच्या काही गरजा लक्षात घेऊन कोणत्याही कालखंडातील रंजनपर वाङ्मय निर्मितीचे अंदाज बांधलेले असतात. त्याच्या स्वभाव धर्माची ही वैशिष्ट्ये व त्याच्या गरजा जोवर कायम आहेत तोवर वास्तववादी साहित्य निर्मिती देखील सातत्याने व विपुल प्रमाणात होत राहणार आहे. समाजातील अशा बाधितांच्या समस्या, वेदना यांचा वाचकांना या संशोधनातून परिचय करून देण्यासाठी हा विषय मी निवडला आहे. त्या दृष्टीने साहित्याचे वाचन करून जुळवाजुळव केली व प्रबंधाची रूपरेषा तयार केली ती पुढील प्रमाणे-

<u>विषयाचे महत्त्व आणि निवड:-</u>

कोरोना व्हायरस रोग २०१९ कोविड-१९ हा एक अति संसर्गजन्य रोग आहे. जो गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम संबंधित कोरोना व्हायरस-२ अथवा (एसआरएस को-२) (SARS-Cov-२) या नावाच्या नवीन विषाणूद्वारे होतो. ज्या सार्स (SARS-Cov-१) या रोगांनी आग्नेय आशियामध्ये थैमान घातले होते. त्या कोरोना व्हायरस विषाणूच्या प्रजातीतील पण पूर्णपणे नवीन असा हा विषाणू आहे. 'CO' म्हणजे कोरोना 'VI' म्हणजे व्हायरस आणि 'D' म्हणजे रोग यापूर्वी या आजाराला २०१९ नोव्हेल कोरोना व्हायरस किंवा २०१९-ncov असे संबोधले जात असे.

डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या हुबेई प्रांताची राजधानी 'वुहान' मध्ये या नवीन आजाराची पहिली ओळख करण्यात आली होती. आणि त्यानंतर जागतिक स्तरावर या आजाराचा प्रसार सुरू झाला व त्याने जागतिक महामारीचे रूप घेतले.या आजाराच्या सामान्य लक्षणांमध्ये ताप, खोकला, दम लागणे, यांचा समावेश होतो. तर इतर लक्षणांमध्ये थकवा, स्नायू दुखणे, अतिसार, घसा खवखवणे, गंध कमी होणे आणि पोटदुखी या लक्षणाचा समावेश होतो. सामान्यता लागण झाल्यापासून लक्षणे दिसण्यापर्यंतचा कालावधी हा दोन ते चौदा दिवसांचा असतो. बहुतेक प्रकरणांमध्ये सौम्य लक्षणे आढळतात, तर काही रोगांमध्ये वायरल निमोनिया आणि बहुअवयव निकामी होण्याची भीती असते. १२ एप्रिल २०२१ पर्यंत जगातील १८५ देशातील १३, ५८,६९,७०४ पेक्षा अधिक लोकांना हा रोग झाला असल्याची प्रकरणे नोंदविली गेली आहे. परिणामी २९,३५,२७१ पेक्षा जास्त लोक मरण पावले आहेत. ७,७२,८४,५६६ पेक्षा जास्त लोक बरे ही झाले आहेत. एकूण संसर्ग झालेल्या रोग्यांपैकी २% लोकांचा मृत्यू झाला आहे.

महाराष्ट्रातील कोरोना विषाणू उद्रेकातील पहिल्या रुग्णांची नोंद ९ मार्च २०२० रोजी पुण्यात झाली. या रोगाच्या निदानाची मानक पद्धत म्हणजे नाकातून घेतलेल्या नमुन्याची रियल टाईम रिव्हर्स ट्रान्स क्रिप्शन पॉलीमरेज रिएक्शन (rRT-PCR) नावाची तपासणी केली जाई. याच कोरोना महामारीचे जीवनचित्रित करणाऱ्या कादंबऱ्या व कथासंग्रहाचे चित्रण यात दिसून येत आहेत.

'साहित्य समाजमन घडवीत असते', त्यातून वास्तववादी दृष्टिकोन व समस्यांना तोंड देण्यासाठी जगण्यासाठीचे बळ मिळते. या प्रकारच्या समस्या या कथात्मक साहित्यातून कोरोना महामारीतील लोकांचे प्रश्न, दुःख, विचार, वेदना, संवेदना, मराठी कथात्म साहित्यात स्पष्ट झाले आहे का? मराठी कथात्म साहित्यातून कोरोना महामारीतील लोकांच्या जीवनाचे यथार्थ चित्रण घडते का? या वास्तववादी प्रश्नांच्या उत्तराच्या शोधातून मराठी कथात्म साहित्यातील कोरोना महामारीच्या जीवन चित्रणांचा वेगळा अभ्यास होणे आवश्यक आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते.

त्यातूनच मी "मराठी कथात्म साहित्यातील कोरोना महामारीचे जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास"या अनुषंगाने संशोधन करण्याचे ठरविले प्रस्तुत विषय हा वास्तववादी व महत्त्वाचा असल्याचे जाणवले.

संशोधन पद्धती:-

१) मराठी कथात्म साहित्यातील कोरोना महामारीच्या जीवनचित्रणाचा चिकित्सक अभ्यास करणे प्रस्तुत संशोधनामागचा प्रमुख हेतू आहे.

२) प्रस्तुत शोध प्रबंधाच्या संशोधन विषयाचा अभ्यास करताना मी संशोधनमान्य वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे.

३) लिखित साधनाच्या वापरामध्ये मूळग्रंथ, समीक्षणे, नियतकालिके, मासिके, आंतरजाल इत्यादीचा वापर करणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:-

१) मराठीतील वास्तववादी कथात्म साहित्याचा अभ्यास करणे.

२) कोरोना महामारीतील लोकांच्या वास्तव जीवनाचा अभ्यास करणे.

३) मराठीतील कथात्म साहित्यातील कोरोना महामारीतील लोकांच्या जीवन संघर्षाचा अभ्यास करणे.

४) कोरोना महामारीच्या आलेल्या संकटानुसार लोकांचे जीवन परिवर्तन शोधणे.

५) कोरोना महामारीतील लोकांच्या समस्या, प्रश्न जाणून घेणे.

६) मराठीतील कथात्म साहित्यातील ज्ञानेश्वर जाधवर, पवन भगत, डॉ.श्रीकांत पाटील, डॉ.हरिश्चंद्र बोरकर, रा.रं. बोराडे, डॉ.महेश अभ्यंकर, आरती भार्ज यांच्या कथात्म साहित्यातून स्पष्ट होणाऱ्या कोरोना महामारीतील जीवनचित्रणाचा अभ्यास करणे.

७) कोरोना महामारीतील, अबालवृद्ध, तरुण, त्यांचे कुटुंब, त्यांचे दुःख, समस्या त्याचे जीवन यांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके:-

१) कोरोना महामारीतील लोकांचे, समाजाचे वास्तववादी चित्रण कथात्म साहित्यात आले आहे.

२) वास्तववादी कथात्म साहित्यातून कोरोना महामारीचे जीवनचित्रित झाले आहे.

३) समाजातील सर्व स्तरातील कोरोना महामारीचे बदलते वास्तववादी रुप कथात्म साहित्यात चित्रित केले आहे.

४) कोरोना संक्रमित व त्याच्याकडे बघण्याचा वेगळा दृष्टिकोन बदलला आहे.

५) या कथात्म साहित्यात कोरोना महामारीतला संघर्ष चित्रित केले आहे.

६) कोरोना महामारीने सामान्य माणसाच्या जगण्याचा पाया उखडून टाकला आहे.

७) वेदनेच्या वाटेवरून मानवी सत्याकडे जाणारा हा एक प्रवास आहे.

संशोधनाची मर्यादा:-

प्रस्तुत संशोधनाची मर्यादा पुढीलप्रमाणे :-

या संशोधनात मराठी कथात्म साहित्यातील वास्तववादी लेखनाचा शोध कोरोना महामारीतील जीवन चित्रणाच्या विषयास केंद्रभूत ठेवून महामारीने पछाडलेल्या लोकांच्या जीवनाचा शोध घेतला जाणार आहे. या महामारीतील लोकांचे जीवन कोरोनाने बाधित झाले आहे. अशा या शोध प्रबंधाची मांडणी आपणास पुढील प्रकरणात करता येईल. अशा प्रकारचे निष्कर्ष या प्रकरणात मांडले आहेत. यातील फक्त काही उध्दृत केले आहेत.

संशोधनाची प्रकरणनिहाय मांडणी:-

१) मराठी कथात्म साहित्याचा संक्षिप्त परिचय : एक दृष्टिक्षेप.

२) मराठी कथात्म साहित्यातील कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या व कथासंग्रहाचे कथानक.

३) कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या व कथासंग्रहातील व्यक्तिरेखा.

४) कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या व कथासंग्रहातील समस्या व जीवन संघर्षाचे स्वरूप.

५) कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या व कथासंग्रहाचे वाङ्मयीन विशेष.

६) उपसंहार.

प्रकरण पहिले

मराठी कथात्म साहित्याचा संक्षिप्त परिचय : एक दृष्टिक्षेप

मराठी कथात्म वाङ्मय प्रकार परंपरेने चालत आलेला आहे. मराठी वाङ्मयात कथात्म वाङ्मय प्रकाराचे महत्त्व विविध मुद्याव्दारे स्पष्ट करण्यात आले आहे. वास्तववादी कथात्म साहित्याचे स्वरूप, संकल्पना, सुरुवात प्रकार याचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे. यात प्राधान्याने कोरोना महामारीतील जीवनचित्रण असणाऱ्या मराठी कथात्म साहित्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

प्रकरण दुसरे

मराठी कथात्म साहित्यातील कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या व कथासंग्रहाचे कथानक

कोरोना सारख्या संसर्गजन्य साथीच्या आजाराने उद्‌भवलेल्या भयकारी अस्वस्थ वर्तमानाचा कालपट मानवी जीवनावर आलेल्या समस्या यांचा अभ्यास या कथात्मक साहित्यातून करण्यात आला आहे. कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेल्या अकल्पित संकटामुळे उध्दवस्त झालेल्या कुटुंबाची प्रातिनिधीकता यातून मांडण्यात आलेली आहे. मानवी नात्याची उलथापालथ, हेळसांड कशी झाली याचे चित्रण, अचानक लादलेल्या टाळेबंदीमुळे लाखो लोकांसमोर आलेल्या स्थलांतराच्या समस्या, त्यांच्यासमोर आलेला उदरनिर्वाहाचा प्रश्न, आर्थिकदृष्ट्या आलेली कमकुवतता, जगण्याचा दृष्टिकोन आणि संक्रमितांच्या कुटुंबाकडे पाहण्याचा तुच्छतेचा दृष्टिकोन, त्यांची केली जाणारी अवहेलना, या सर्व घटकांच्या अनुषंगाने कथानके चित्रित केलेली असून याचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

कोरोना सारख्या महामारीमुळे उद्‌भवलेल्या समस्या,त्या समाजातील भयावह विदारकता, व्यक्ती जीवन, समाजजीवन, यांचा अभ्यास करणारी कथानके या कथात्मक साहित्यात दिसून येतात. यामध्ये मध्यमवर्गीय समाजमन, मर्यादित विचारविश्व साकारण्याचे मराठी लेखकांचे कसब, अभ्यासवृत्ती यांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

प्रकरण तिसरे

कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या व कथासंग्रहातील व्यक्तिरेखा

मराठी कथात्म साहित्यामध्ये व्यक्तिचित्रणे हा एक महत्त्वपूर्ण मूलभूत घटक आहे. कथा व कादंबरी वाङ्मय प्रकारात येणाऱ्या व्यक्तिरेखा या त्यांच्या विविध गुण व अवगुणासहित कादंबरीत व कथेत चित्रित झालेल्या असतात. त्या त्या व्यक्तिरेखांचे बाह्य वर्णन, विविध गुण विशेष, कौशल्य यांचा अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या व कथासंग्रहातील संक्रमितांचे व समाजातील इतर व्यक्तीचे जीवनचित्रण करणाऱ्या व्यक्तिरेखा मध्ये स्त्री व्यक्तिरेखा व पुरुष व्यक्तिरेखा अशी विभागणी केली आहे. या व्यक्तिरेखांमध्ये कोरोना विषाणूचे संक्रमण झालेल्या, संक्रमितांच्या, त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या, मध्यमवर्गीय लोकांच्या, तसेच उच्चवर्णीय समाजातील लोकांच्या, उदरनिर्वाहासाठी तडजोड करणाऱ्या, टाळेबंदीमध्ये पिंजऱ्यात कोंडलेल्या, अन्नान दशा झालेल्या, एकमेकांपासून भावनिकदृष्ट्या दुरावलेल्या, मर्यादित विचार विश्व असणाऱ्या, महामारीला तोंड देणाऱ्या आणि तिच्याशी दोन हात करत संघर्ष करणाऱ्या व्यक्तिरेखांचा समावेश होतो.

या सर्व व्यक्तिरेखा आपल्या आयुष्यात कोरोनाच्या आलेल्या संकटाला स्वीकारून जगण्याचा व त्यातून पुढे जाण्याच्या मार्गाचा शोध घेताना दिसतात. यातील काही उच्चवर्णीय, काही मध्यमवर्गीय, स्त्री, बाल, वृद्ध, सर्वच स्तरातील लोक या महामारीला सामोरे जाणारे आहेत. यातले काही महामारीतील संक्रमित, आहेत. तर काही त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती, विविध जाती-धर्मातील, वेगवेगळ्या संस्कृती, शेजारी, मित्र परिवार, श्रीमंत, गरीब, रुग्ण, डॉक्टर परिचारिका, महामारीचा फायदा घेणारे आणि सेवा देणारे आहेत. या सगळ्या व्यक्तिरेखा मध्ये एक समानता आहे, ती म्हणजे हे सर्व फक्त न फक्त मानव आहेत .

प्रकरण चौथे

कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या कथासंग्रहातील समस्या व जीवन संघर्षाचे स्वरूप

कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या व कथासंग्रहातून लेखकांनी अभूतपूर्व अशा मानवी विस्थापनावरचा प्रामाणिक दस्तऐवज आपल्या लेखनात मांडला आहे. अचानक झालेल्या टाळेबंदीमुळे लाखो कामगारांवर कोसळलेल्या स्थलांतराच्या दाहक कथा, व्यथा यात मांडल्या आहेत. कोरोना महामारीच्या भयान संकटात जगलेल्या, तगलेल्या,

एकमेकांना सावरत विखुरलेले आयुष्य पुन्हा उभारण्याच्या प्रयत्नात असलेल्या माणसांच्या अनोख्या कथा यात आहेत. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी अगदी भिन्न आहे भिन्नच नाही तर परस्परविरोधी आणि एकमेकांना छेदणारी असली तरी या काळात अशा वृत्ती-प्रवृत्ती एकत्र आल्याचे दिसून येते. अशा या काळात चालू असलेला संघर्ष व त्याला तोंड देत असताना परोपकार, प्रेम आणि सहकार्य या शाश्वत मानवी भावनांचे दर्शन यांचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

काही वर्षांपूर्वी आलेल्या कोरोना महामारीने सामान्य माणसाच्या जगण्याचा पायाच उखडून टाकला होता. रातोरात लॉकडाऊन लादण्यात आले एका झटक्यात रोजगार बंद पडले. हातावर पोट असलेली लाखो माणसे नाईलाजाने रस्त्यावर आली. रोजगाराच्या शोधात असलेल्या या लोकांचा पुन्हा आपल्या गावाकडे उलटा प्रवास सुरू झाला, 'वेदनेच्या वाटेवरून मानवी सत्याकडे जाणारा तो प्रवास आहे'. अशा स्थितीत सापडलेल्या लोकांच्या जीवन संघर्षाचे स्वरूप प्रस्तुत प्रकरणात स्पष्ट केले आहे.

प्रकरण पाचवे

कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या व कथासंग्रहाचे वाङ्मयीन विशेष

मराठी कादंबरी वाङ्मय प्रकार मुळात व्यापक स्वरूपाचा असल्यामुळे या वाङ्मय प्रकाराची भाषा ही प्रभावी, बोलकी, मनोरंजक व समस्यांचे चित्रण करणारी आहे. त्याचबरोबर उपमा, प्रतिमा, अलंकार, प्रादेशिक बोलीतील म्हणी, वाक्यप्रचार, शब्द, प्रादेशिक विविध बोलीभाषा यांचे प्रत्यंतर या कोरोना महामारीचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यात दिसून येते.

कथेचा जन्म हा भाषेच्या जन्माइतकाच प्राचीन आहे. कथा हा कथात्मक साहित्याचा उपप्रकार असून कथेची समष्टी कथार्थ, कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, भाषाशैली यांची बनते. कथेची संरचना लवचिक असून कथाच कथेची संरचना घडवत असते.

या कोरोना महामारीचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांमध्ये कोरोनाच्या पहिल्या लाटेतील विदारक अनुभवाच अतिशय प्रत्ययकारी वर्णन आहे. लॉकडाऊनच्या निर्णयाने सामान्य माणसाच्या आयुष्याची परवड झाली आणि त्यांना जाच सहन करावा लागला .त्याचं फार आर्त, वर्णन सर्वच स्तरातील लोकांची होणारी घुसमट, दुःख, वेदना स्पष्ट करणारी भाषा, त्यांच्या समोर असलेल्या प्रश्नांचा डोंगर, या कथात्मक साहित्यातून विविध छटांनी स्पष्ट केला आहे.

सारांशाने असे म्हणता येईल की, या महामारीने पछाडलेल्या मनुष्याचे जीवन चित्रण करणाऱ्या कथात्मक साहित्याची भाषा ही व्यक्तीनुसार, प्रदेशानुसार, वयानुसार, लिंगानुसार, व्यवसायानुसार बदललेली दिसून येते. त्याचबरोबर कोरोना महामारी त्यावेळचे वातावरण, समाजाचे वर्णन याचा या प्रकरणात अभ्यास केला आहे.

<u>प्रकरण सहावे</u>:

उपसंहार

एकंदरीत शोध प्रबंधामध्ये प्रत्येक प्रकरणांमध्ये केलेले संशोधन व त्या संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष यांची मांडणी या प्रकरणात केली आहे.

कोरोना महामारीचे जीवनचित्रण स्पष्ट करणाऱ्या कथात्मक साहित्याच्या आधारे काढलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे सांगता येतील-

<u>निष्कर्ष</u>:-

१) कोरोना महामारीतील पहिल्या लाटेतील विदारक अनुभवाचे अतिशय प्रत्ययकारी वर्णन या कथात्म साहित्यात दिसून येते.

२) माणसांना आलेले भयावह अनुभव व उदरनिर्वाह करण्यासाठी करावी लागणारी धडपड यांचे रेखाटन केले आहे.

३) कोरोनाच्या दहशतीखाली सर्व यंत्रणा नियोजन आणि व्यवस्थापनाची क्षमता हरवून बसतात.

४) कोरोनामुळे माणसांमधला स्वकेंद्रीतपणा अधिक गडद झाला आणि हे कथात्म साहित्य ते तीव्रतेने मांडते.

५) या साहित्यात अनेक प्रादेशिक बोली भाषांचा समावेश असून त्यातून जनसामान्यांच्या समस्या मांडलेल्या दिसून येतात.

६) कोरोना महामारीतील लोकांच्या मनोव्यथा साकार करून त्यांच्या विविध समस्या स्पष्ट केल्या आहेत.

७) कोरोना महामारी सारख्या भीषण स्थितीतही काही लोक कसे निर्दयी, स्वार्थी आणि दुटप्पी वागतात, हे छोट्या-छोट्या प्रसंगातून जाणवते. तसेच दुसऱ्यांसाठी झटणारे नि:स्वार्थ आणि माणुसकी जपणारे लोकही आहेत. स्वार्थी आपल्या पायांपुरत पाहणारे आणि क्रूर लोकही या प्रवृत्ती मधला फरक आहे आणि संघर्ष ही.

८) या कथात्मक साहित्यातील व्यक्तिरेखा या थेट वाचकांच्या हृदयाला भिडणाऱ्या वाचकांच्या मनाचा शोध घेणाऱ्या दिसतात.

९) कोरोना महामारी मध्ये सापडलेल्या समाजाच्या वाट्याला आलेल्या भोगाचे यथार्थ चित्रण या कथात्म साहित्यात दिसून येते.

१०) या महामारीच्या विळख्यात सापडलेल्या जीवनाच्या वेगळ्या बाजूचे दर्शन घडू लागते. त्याच्यात बदल सुरू होतात. धर्म, जात, प्रांत, भाषेचे अहंकार गळून पडायला लागल्याचे दिसून येतात.

११) भूक आणि भाकरी, सहयोग आणि सहकार्य, प्रेम आणि परोपकार हेच मानवी जीवनाला आधार देणारी मूलभूत तत्त्व आहेत हे दिसून येते.

१२) या कथात्म साहित्यातून संपूर्ण समाज जीवनावर सर्वांगीण प्रकाश पडतो. कोरोना महामारीत सापडलेल्या लोकांच्या मनाची घालमेल दिसून येते.

१३) यातील लोकांना भेदभाव, विषमता, वर्चस्ववाद हे माणसाचे मूळ तत्त्व नाही याची जाणीव त्यांना होते, आणि त्यांचा मानवतेकडे प्रवास सुरू होतो हे दिसून येते.

१४) अभ्यासित कथात्म साहित्याच्या आधारे असा ही निष्कर्ष निघतो की, या साहित्याचे लेखन जिवंत प्रत्ययकारी व वास्तवदर्शी झाले आहे.

१५) प्रादेशिक भाषेतील, बोली भाषेतील शब्दसंपत्ती, म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा यामुळे भाषिक सौंदर्य वाढले आहे.

१६) एकूणच कोरोना महामारीचे जीवनचित्रण करणाऱ्या या कथात्मक साहित्याची भाषा कधी सौम्य तर कधी आक्रमक होताना दिसते.

<u>आधारभूत कथात्म साहित्य</u> :-

१)	'लॉकडाऊन'	-	ज्ञानेश्वर जाधवर (कादंबरी)
२)	'कोरोनाचा कोप'	-	डॉ.हरिश्चंद्र बोरकर (लघु-कादंबरी)
३)	'ते पन्नास दिवस'	-	पवन भगत (कादंबरी)
४)	'लॉकडाऊन'	-	डॉ.श्रीकांत पाटील (कादंबरी)
५)	'माझं गाव माझी माणसं'	-	रा.रं. बोराडे (कथासंग्रह)
७)	'इमोझील'	-	डॉ. महेश अभ्यंकर, आरती भार्ज (कथासंग्रह)

माझे संशोधन कार्य सुरु असताना वरील आधारभूत साहित्याशिवाय इतर ग्रंथ मिळाले तर त्यांचाही मी संशोधनात समावेश करणार आहे.

संदर्भ ग्रंथसुची :-

१)	मराठी कादंबरी इतिहास	-	चंद्रकांत बांदिवडेकर
२)	मराठी कादंबरी पहिले शतक	-	कुसुमावती देशपांडे
३)	कादंबरी : एक वाड्मय प्रकार	-	जान्हवी संत
४)	मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास)	-	प्रभाकर बापट, नारायण गोडबोले
५)	कांदबरीची रचना	-	कुलकर्णी. श्री. मा.
६)	वाड्मयीन संज्ञा : संकल्पना कोश	-	रमेश वरखेडे, आशा राजवाडे, वसंत डहाके, जया दडकर
७)	कादंबरी विवेचन आणि विश्लेषण	-	देशपांडे बालशंकर
८)	मराठी नवकादंबरी	-	सारंग विलास
९)	साहित्याचे मानदंड	-	गाडगीळ गंगाधर
१०)	मराठी कथा उगम आणि विकास	-	शेवडे इंदूमती
११)	मराठी कथा साहित्य एक आलेख	-	अदवंत म.ना.
१२)	कथा : संकल्पना आणि समीक्षा	-	जोशी सुधा
१३)	'साहित्याचा अन्वयार्थ'	-	कोत्तापल्ले नागनाथ
१४)	मराठी साहित्य : प्रेरणा आणि स्वरुप 1950 ते 1975 या ग्रंथातील डॉ.भाचंद्र नेमाडे यांचा कादंबरीवरील लेख		

मार्गदर्शक
प्रा.डॉ.गणेश रामभाऊ लहाने
(उपप्राचार्य)
दयानंद वाणिज्य महाविद्यालय,
लातूर

संशोधक
कु.शितल गोविंद खोत

संशोधकाचे नाव :- कु.शितल गोविंद खोत

मोबाईल नं. :- ९१४५०५१२१५

ई-मेल आयडी :- khotshital१९९५@gmail.com

जात / संवर्ग :- ओबीसी (OBC)

विषयाचे नाव :- मराठी

संशोधन विषयाचे शीर्षक :- मराठी कथात्म साहित्यातील कोरोना महामारीचे जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास

मार्गदर्शकाचे नाव :- प्रा.डॉ.गणेश रामभाऊ लहाने

(उपप्राचार्य) दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर

मार्गदर्शकाचा मोबाईल नं. :- ८२७५९४१३०३

मार्गदर्शकाचा ई-मेल आयडी :- lahanegr@gmail.com